विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २०२ वा | मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

तीन बांगलादेशी नागरिकांना दोन वर्षांची शिक्षा

पोखरापूर (कटूसत्य वृत्त):- मोहोळ तालुक्यातील चिंचोलीकाटी एमआयडीसीतील दोन कंपन्यांमध्ये नोकरी व वास्तव्य करणाऱ्या तीन बांग्लादेशी नागरिकांवर मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत मोहोळ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी स. वा.ठोंबरे यांनी आरोपींना प्रत्येकी 2 वर्षे कारावास व प्रत्येकी 10 हजार रुपए दंडाची शिक्षा सुनावली. कोणत्याही वैद्य कागदपत्रांशिवाय तसेच भारत-बांग्लादेश सीमेवरील मुलकी अधिकारी यांच्या लेखी परवानगीशिवाय घुसखोरीच्या अवैद्य मार्गाने भारतात प्रवेश करून येथील दोन कंपन्यांमध्ये बांग्लादेशी राहत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकार्यांच्या मार्गदर्शनानुसार मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे, दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ कदम यांच्या टीमने संयुक्त कारवाई करत दि. 26 डिसेंबर रोजी कंपनीमधील कामगारांसाठी राहण्याकरता बांधलेल्या खोल्यांमध्ये चंचल विश्वनाथ पहान, अजहर अली हुजूर अली हटवली, मीनल शनिचर कुलमनी हेलराम सर्व (रा. बांग्लादेश) तिघांना अटक केले. तिघांच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सरकारने घात केला, कर्जमाफीच्या नुसत्या बाता

साडेसहा लाख शेतकऱ्यांचे सहा लाख कोटी थकवले

मुंबई (कटूसत्य वृत्त):- राज्याच्या तिजोरीत सध्या खडखडाट निर्माण झाला आहे. निधीअभावी अनेक लोकप्रिय घोषणांना कात्री लावण्याची तयारी महायुती सरकारने सुरू केलेली आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा होईल अशी बळीराजाला अपेक्षा होती, पण प्रत्यक्षात राज्यातील 6 लाख 56 हजार शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असल्याची आकडेवारी पुढे आली आहे. सरकारी अटी-शर्तीची पूर्तता करूनही या शेतकऱ्यांची 5 हजार 975 कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम सरकारने थकवली आहे.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने महायुती सरकार शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा करेल अशी आशा कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची होती, पण कोणताही नवीन घोषणा झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड निराशा झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) रोहित पवार यांनी राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी लाभ व प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत विधिमंडळाच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत लाभास पात्र असलेल्या 50 लाख 60 हजार शेतकऱ्यांपैकी 44.4 लाख शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत 6 लाख 56 हजार शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. तर महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत (2019 वर्ष) पात्र असलेल्या 32.42 लाख शेतकऱ्यांपैकी 32 लाख 27 लाख (99.53) शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आल्याचे उत्तरात नमूद केले आहे.

पीक कर्जवाटपात विलंब

खरीप हंगामात बँका पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून आठ बँकाच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आल्याचे अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे.

अटी-शर्तीची पूर्तता, पण कर्जमाफी नाही

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 25 हजार रुपयांचे प्रोत्सहन अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. राज्यातील शेतकऱ्यांनी गेल्या आठ वर्षांपासून सर्व अटी-शर्तीची पूर्तता करूनही 6 लाख 56 हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित असल्याचे सहकार मंत्र्यांनी उत्तरात मान्य केले आहे. मागील आठ वर्षांपासून अटी शर्तीची पूर्तता करूनही 6 लाख 56 हजार शेतकरी हे 5 हजार 975 कोटी इतक्या कर्जमाफी लाभापासून वंचित आहेत हे खरे आहे काय असा प्रश्न होता. या प्रश्नावरील लेखी उत्तरात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शेतकरी कर्जमाफीपासून सुमारे साडेसहा लाख शेतकरी वंचित आहे हे खरे असल्याचे मान्य केले आहे.

बंदचा आदेश असतानाही चिकन विक्री खुलेआम सुरू



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन फक्त कागदी घोडेच नाचवत असल्याचे आजही दिसले. किल्ला बाग व धर्मवीर संभाजी महाराज तलाव परिसरातील चिकन, अंडी व तत्सम पदार्थांची विक्री बंदचा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढला.

या आदेशाची अंमलबजावणी कोणी करायची? यावरून महापालिका, पोलिस, अन्न प्रशासन व पशुसंवर्धन विभागात संभ्रम असल्याने या भागातील चिकन विक्री खुलेआम सुरू होती.

किल्ला बाग व धर्मवीर संभाजी महाराज तलाव परिसर २१ दिवसांसाठी प्रतिबंधितही केला आहे. या ठिकाणी माणसांचा बिनधास्त वावर असल्याचे दिसले.

सोलापुरात कावळ्यांचा मृत्यू वाढत असताना प्रतिबंधात्मक आदेशाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय विभाग टोलवाटोलवी करताना दिसत आहेत. विजापूर रोडवरील तलाव परिसरात दोन मृत कावळे नागरिकांना दिसले.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांत फिरणार पाणी

९ उपसा सिंचन योजनेसाठी ५०४ कोटी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- एक नव्हे दोन नव्हे तर जिल्ह्यातील तब्बल ९ उपसा सिंचन योजनेच्या कामांसाठी ४८९ कोटी ५ लाख रुपयांची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पात तसेच पूर्णत्वाकडे आलेल्या व जून अखेरपर्यंत पूर्ण होणाऱ्या शिरापूर उपसा सिंचन योजनेसाठी १५ कोटी रुपये नाबार्डने दिले आहेत.

सांगोला, मंगळवेढा व बार्शी उपसा सिंचन योजनेसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील बहुतांशी शेती पूर्णतः उजनी धरणाच्या पाण्यावर बागायती झाली आहे.

करमाळा तालुक्यात काही क्षेत्र कुकडी, माळशिरस तालुक्यात वीर भाटघर, निरा देवधर, उजनी तर सांगोला तालुक्यात वीर भाटघर, म्हैसाळ, टेंभूच्या पाण्याचा शेतीला फायदा होत आहे.

याशिवाय कोरड्या-बोडक्या माळरानासाठी तब्बल ९ उपसा सिंचन योजनांची कामे सुरू आहेत. १९९७ पासून बार्शी व शिरापूर उपसा सिंचन योजनेची कामे सुरू आहेत.

त्यापैकी शिरापूर उपसा सिंचन योजनेचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या जून महिन्यापर्यंत योजनेचे काम पूर्ण होईल, असे उप कार्यकारी अभियंता बाबासाहेब जाधव यांनी सांगितले.

सांगोल्यासाठीच्या स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेसाठी ७० कोटी, बार्शी उपसा सिंचन योजनेसाठी ६९ कोटी ७२ लाख, मंगळवेढा उपसा सिंचनसाठी ५४ कोटी रुपये, आष्टी उपसा सिंचनसाठी ४० कोटी, दहिगाव उपसा सिंचनसाठी २५ कोटी, सीना-माढा साठी २० कोटी तर शिरापूर उपसा सिंचनसाठी १५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यातून नियोजनाप्रमाणे कामे होतील.

- धीरज साळे, अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र प्राधिकरण

शिरापूर योजनेसाठी नाबार्डकडून १५ कोटी रुपये मंजूर

शिरापूर उपसा सिंचन योजनेचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. जून महिन्यापर्यंत काम पूर्ण होईल. शिरापूर योजनेसाठी नाबार्डकडून १५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या योजनेमुळे सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील गावांना लवकरच पाणी मिळण्यास मदत होणार आहे. तसेच सांगोला, मंगळवेढा व बार्शी उपसा सिंचन योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

समाविष्ट उपसा सिंचन योजना

अक्कलकोट व दक्षिण तालुक्यासाठी एकरुख उपसा सिंचन योजना, उत्तर सोलापूर तालुक्यासाठी शिरापूर, बार्शी तालुक्यातील शेतीसाठी बार्शी उपसा सिंचन योजना, मोहोळसाठी आष्टी उपसा सिंचन, सांगोल्यासाठी स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन, करमाळ्यासाठी दहिगाव उपसा, माढा तालुक्यासाठी सीना-माढा व मंगळवेढ्यातील जमिनीसाठी मंगळवेढा उपसा सिंचन योजनांची कामे सुरू आहेत. या आठ योजनांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात ४८९ कोटी ५ लाख रुपयांची तर शिरापूर उपसा सिंचन योजनेसाठी नाबार्डने १५ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

शिरापूर उपसा सिंचन योजनेसाठी मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात ५० कोटींची तरतूद करण्यात आली होती. या मार्चपर्यंत त्यातील ३५ कोटी खर्च होतील व १५ कोटी शिल्लक राहतील असे सांगण्यात आले. याशिवाय नाबार्डने दिलेले १५ कोटी रुपये आहेतच.

दहावी उपसा सिंचन योजना

जिल्ह्यात या ९ उपसा सिंचन योजनेशिवाय अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतीसाठी देगाव उपसा सिंचन योजनेचे काम सुरू आहे. देगाव जोडकालव्याचे काम पूर्ण झाल्याने आता पूर्ण झालेल्या कालव्यातून उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतीला पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बर्ड फ्लू संसर्ग प्रतिबंधासाठी प्रभावी अंमलबजावणी करावी- जिल्हाधिकारी

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महापालिकेच्या हद्दीतील छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसरात 7 मार्च रोजी कावळा व बगळा या पक्षांचा नैसर्गिक मृत्यू झाला होता. त्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येऊन त्या प्राण्यांना बर्ड फ्लू असल्याचा अहवाल प्राप्त झालेला होता. त्या अनुषंगाने बर्ड फिल्म प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राष्ट्रीय कृती आराखडा 2021 नुसार उपरोक्त दोन्हीही परिसर हे दक्षता झोन म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. तरी सर्व शासकीय विभागानी या क्षेत्रात व अन्य भागात बर्ड फ्ल्यू च संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्ह्यात बड फ्ल्यू चा संसर्ग होऊ नये या अनुषंगाने करावयाच्या उपाय योजनेच्या दृष्टीने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर व्हि डि. येवले, जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ एन. एल. नरळे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ.

भास्कर पराडे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. संतोष भोई यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की महानगरपालिका हद्दीतील छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसर हे बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत त्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभाग व पोलीस विभागाने या परिसरातील सर्व चिकन शॉप बंद करावेत. महापालिकेने या परिसराचे निर्जंतुकीकरण करून घ्यावे. या परिसरात सर्वसामान्य नागरिकांच्या माहितीसाठी बॅनर्स लावावे तसेच महापालिकेने या ठिकाणी माहिती देण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाने या भागातील घरगुती प्राणी पक्षी यांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे व त्यातील आजारी प्राण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

मृत्यू पावलेल्या पक्षांचे डिस्पोजल महानगरपालिकेने करावे त्यासाठी जागा शोधून ठेवावी. वन विभागाने जंगली पक्ष मृत्यू पावल्यास त्याचे डिस्पोजल साठी महानगरपालिकेकडे पाठवावे. पक्ष्यांच्या डिस्पोजल साठी महानगरपालिकेने पथके तयार करावीत. प्रत्येक विभागाने कृती आराखड्याप्रमाणे त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे पार पाडून हा आजार इतरत्र फैलावणार नाही यासाठी दक्ष रहावे असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. तसेच सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी बर्ड फ्लू आजाराच्या अनुषंगाने घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. हा आजार पक्षांमध्ये आढळून आलेला आहे, परंतु हा आजार इतरत्र फैलावणार नाही यासाठी (पान 2 वर..)

ग्रंथालयांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करेन : खा. अमर काळे

वर्धा (कटूसत्य वृत्त):- सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनेक समस्या आहेत. मी खासदार म्हणून आपल्या सोबत राहीन. पण त्या मागण्यांचा पाठपुरावा आपण करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन खा. अमर काळे यांनी वर्धा येथे झालेल्या ५९ व्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या अधिवेशन उद्घाटन प्रसंगी काढले. वाचन संस्कृती टिकली पाहिजे, वाचनाने व्यक्ती ज्या देशात राहतो तो देश, भाषा, सांस्कृतीक व वैचारिकदृष्ट्या समृद्ध असतो. ग्रंथालय कर्मचारी आत्महत्या करतात हे ऐकून मन खिन्न झाले. ही खूप मोठी शोकांतिका आहे. या समस्या सोडविण्यासाठी मी आपल्या सोबत राहीन असे उद्गार खासदार यांनी काढले.यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार,कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, प्रभारी ग्रंथालय संचालक,

अशोक गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, ग्रंथालय संघाचे कार्यपाध्यक्ष राम मेकले, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार, जिनदार भीमराव पाटील,सहाय्यक रामदास साठे ग्रंथालय संचालक,रामदास साठे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनोने, डॉ. श्रीपाद जोशी प्रा. डॉ.नारायण निकम आदी उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अधिवेशन लोक महाविद्यालय, वर्धा, येथून शिवकुमार शर्मा, कुंडलिक मोरे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, यांचे शुभ हस्ते ग्रंथ पालखीचे पूजन करून ग्रंथदिंडीने सुरुवात केली अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात ग्रंथालय संगणक व इंटरनेट सुविधा यावर डॉक्टर देवेंद्र भोंगाडे डॉक्टर मंगला हिरवाडे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये ग्रंथालय व्यवस्थापन आणि नियोजन यावर किशोर दुमणे, दिलीप कोरे दीपक कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. अधिवेशनाच्या मुख्य उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमात राजेंद्र मुंडे, नारायण निकम, ॲड. राम हरपळे, डॉ. श्रीपाद जोशी, प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष ग्रंथमित्र गुलाबराव पाटील यांनी केले. ५९ वे वार्षिक अधिवेशन - २०२५ उद्घाटन समारंभ १५३१अधिवेशनच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात अभ्यासिका, बालविभाग, स्त्री विभाग सक्षम होणे काळाची गरज यावर चंद्रकांत जोशी, चंद्रकांत जोशी, भाऊसाहेब पत्रे, प्रभाकर कापसे यांनी आपले विचार मांडले. दुसऱ्या सत्रात ऑनलाईन पूर्तता बदल अहवाल यावरती गणेश काकांनी (सीए) आणि नंदू बनसोड यांनी मनोगत व्यक्त केले. तिसऱ्या सत्रामध्ये राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजना आणि प्रस्ताव यावर सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे आणि प्रभाकरराव घुगे यांनी परिपूर्ण असे मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रामध्ये सार्वजनिक कर्मचारी ग्रंथालयाच्या अडीअडचणी,वेतनश्रेणी, ग्रंथालय अनुदानात वाढ,वर्ग बदल आणि नवीन ग्रंथालयाला मान्यता यावर डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र झाले. खुल्या अधिवेशनात ग्रंथालयांचे अनुदान तिप्पट, इमारत, जागा,वर्ग बदल, राज्य ग्रंथालय परिषद, लाईट बिल,इमारत बांधकाम, नवीन ग्रंथालय मान्यता इत्यादी अनेक विषयावरती ठराव होऊन ते एकमताने मंजूर करण्यात आले. उपस्थित ५० महिला प्रतिनिधींना पैठणी साडी देऊन सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे विद्यमान अध्यक्ष मा . ग्रंथमित्र डॉ. गजानन कोटेवार यांनी अधिवेशनाचे आयोजन अतिशय आखीव खीव नीटनेटके केले होते.महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार पुणे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत विद्यार्थ्याने संपविले जीवन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- एम. कॉम. प्रथम वर्षाला शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून जीवन संपविल्याची धक्कादायक घटना सोलापूरमध्ये उघडकीस आली. ही घटना महाविद्यालयाच्या कॅर्मेयात कैद झाली आहे. ही घटना शहरातील दयानंद आर्ट्स अँड सायन्स कॉलेजमध्ये सोमवारी (दि.१७) दुपारी तीनच्या सुमारास घडली. प्रीतम निलेश राऊत (वय २२, रा. सहकारी बँकेच्या वरच्या मजल्यावर टिळक चौक, सोलापूर) असे या विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याला जखमी व बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल

येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती त्याच्या आई-वडिलांना मिळताच नातेवाईकांनी सिव्हील हॉस्पिटलमध्ये हंबरडा फोडला.

खिशात चिट्ठी सापडल्याची माहिती

शहरातील दयानंद महाविद्यालयात हा प्रकार घडला आहे. घटनेची माहिती मिळताच जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी त्याची चौकशी केली असता या विद्यार्थ्याने आपली जीवनयात्रा का संपविली. याचे कारण अजून कळू शकले नाही. पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मात्र प्रीतम याच्या खिशात चिट्ठी सापडल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

विद्यार्थ्याच्या मानसिक स्थितीबद्दल माहिती मिळवली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. विद्यार्थ्याने टोकाचे पाऊल का उचलले? याचा शोध घेण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे. घटनेच्या सर्व पैलूंची सखोल तपासणी केली जाईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे. सध्या पोलिसांकडून विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांशी आणि मित्राशी बोलून त्याच्या मानसिक स्थितीबद्दल माहिती मिळवली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

वर्गात सायन्सचे लेक्चर होते सुरू

कॉलेजमधील सीसीटीव्ही फुटेजमध्ये तो अनेकदा ये-जा करीत असल्याचे दिसत आहे. या घटनेच्या वेळी वर्गात सायन्स विभागाचे लेक्चर सुरू होते. हा विद्यार्थी कॉमर्स शाखेचा होता. याचे कॉलेज सकाळी ११ वाजताच संपले होते. पण, तरीही तो कॉलेज आवारात फिरताना आढळून आल्याने त्याला येथील सुरक्षारक्षकांनी विचारणा केली. तेव्हा त्याने मित्राकडे काम आहे, असे सांगितले. त्यानंतर त्याने सायन्स शाखेच्या बिल्डिंगच्या तिर्सया मजल्यावरून उडी मारली. त्याक्षणी सायन्सचे लेक्चर सुरू असलेल्या वर्गातील विद्यार्थी धावत बाहेर आले. तेव्हा प्रितम हा रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडल्याचे प्रत्यक्षदर्शी विद्यार्थ्यांनी सांगितले.

बोगस टीईटी प्रमाणपत्र देणे भोवले; ५ शिक्षकांची सेवा समाप्ती

जिल्हा परिषद सीईओंची कारवाई

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यात टीईटी घोटाळा झाल्याचे समोर आले होते. या घोटाळ्यात सहभागी असल्याचा ठपका ठेवत बोगस टीईटी प्रमाणपत्र धारक शिक्षकांची सेवा समाप्ती करण्याची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांनी ५ शिक्षकांवर सेवा समाप्तीची कारवाई केली आहे. या कारवाईमुळे सोलापूरच्या शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेत २०१८ व २०१९ मध्ये घोटाळा झाला होता. यामध्ये शिक्षणसेवक पद मिळविण्यासाठी परीक्षेत प्राप्त गुणांपेक्षा अधिक गुण दाखविण्यात आले होते. या प्रकरणी तब्बल सात हजार ८७४ उमेदवारांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. राज्यभरात हा टीईटी घोटाळा गाजला होता. यानंतर सोलापूर जिल्ह्यात बोगस टीईटी प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

कागदपत्र पडताळणीवेळी दिले स्वयंघोषणापत्र

दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील पाच शिक्षण सेवकांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने मार्च २०२४ मध्ये कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविण्यात आली होती. यावेळी या पाचही शिक्षकांनी हजेरी लावली. तसेच तपासणीवेळी कोणत्याही गैरप्रकारात सहभागी नसल्याचे आणि दिलेली कागदपत्रे खरी असल्याचे स्वयंघोषणापत्राचा दाखला दिला होता.

अखेर शिक्षकांवर बडतफीर्ची कारवाई

कागदपत्र पडताळणीनंतर २०२४ साली या पाच शिक्षकांची शिक्षण सेवक पदी नियुक्ती करण्यात आली होती. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, करमाळा, सांगोला तालुक्यात प्राथमिक शिक्षण सेवक म्हणून हे पाचही शिक्षक काम करत होते. दरम्यान जिल्हा परिषदेकडून कागदपत्रांची तपासणी, पडताळणी दरम्यान पुणे सायबर पोलिसात गुन्हा दाखल असलेल्या गुन्ह्यात या पाच शिक्षक सेवकांचा समावेश असल्याचं उघड झाले. यानंतर खोटी आणि बनावट कागदपत्र सादर करून शिक्षण सेवक पदी नियुक्ती मिळवल्याचा ठपका ठेवत सीईओनी बडतर्फ करण्याची कारवाई केली आहे.

संपादकीय

राजकीय धुळवड

'बुरा ना मानो होली है'च्या नावाखाली कोणत्याही प्रकारची चेष्टामस्करी करण्याचा परवाना दिला असला, तरी राजकारणात मुरलेल्या राजकीय नेत्यांनी होळीच्या निमित्ताने अशा प्रकारची चेष्टामस्करी करावी का, हा मात्र वादाचा विषय ठरू शकतो. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या एका विधानामुळे विनाकारणच खळबळ माजली आणि नंतर आपण गमतीने हे विधान केले असा खुलासा त्यांनी केला. त्यांच्या या विधानांवर ज्या विविध प्रतिक्रिया व्यक्त झाल्या त्या पाहता राजकारणात अशाप्रकारे केलेली गंमत कशी विचित्र ठरू शकते हे सिद्ध झाले. सध्याच्या महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पदावर असलेले शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी आमच्या सोबत यावे आम्ही त्यांना आळीपाळीने मुख्यमंत्री करू अशा प्रकारची ऑफर नाना पटोले यांनी दिली होती. सध्या महाविकास आघाडीमध्ये किंवा काँग्रेस पक्षामध्ये कोणत्याही महत्त्वाच्या पदावर नसलेल्या नाना पटोले यांना अशा प्रकारची ऑफर देण्याचा अधिकार आहे की नाही हा जरी वेगळा विषय असला तरी त्यांनी दिलेल्या या ऑफरनंतर ठाकरे शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी तातडीने प्रतिक्रिया देऊन नाना पटोले यांनी ही ऑफर जाहीर करून घाई केली असे म्हटले. एवढेच नाही तर खूप पूर्वीच एकनाथ शिंदे काँग्रेससोबत जाण्यास तयार होते आणि त्यांनी केंद्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अहमद पटेल यांची भेटही घेतली होती अशा प्रकारचे विधानही केले.

या विषयाची व्याप्ती वाढू लागल्यानंतर नाना पटोले यांनी सारवासारव करण्याच्या निमित्ताने आपण होळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर गंमत केली आणि ते विधान सीरियस नव्हते अशा प्रकारचा खुलासा केला. तरी या गमतीच्या निमित्ताने संजय राऊत यांनी जो दावा केला तो तर त्यांना मागे घेता येणार नाही. मुळात शिवसेना फोडून एकनाथ शिंदे भाजपबरोबर जाऊन मुख्यमंत्री झाले होते. साहजिकच एकनाथ शिंदे त्यावेळी खरोखरच काँग्रेससोबत जाण्यास तयार होते का आणि त्यांनी अहमद पटेल यांची भेट घेतली होती का हासुद्धा संशोधनाचा विषय ठरू शकतो. अर्थात, संजय राऊत आपल्या दररोजच्या पत्रकार परिषदेमध्ये कोणत्या ना कोणत्या विषयावर नेहमीच प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. तशाच प्रकारची प्रतिक्रिया त्यांनी नाना पटोले यांच्या या ऑफरच्या विधानावरही दिली असावी.

काळाच्या ओघात त्या प्रतिक्रियाही मागे पडतात. नाना पटोले यांनी केलेल्या या विधानाची दखल काँग्रेसच्या नेत्यांनीही घेतली आणि अनेकांना ही गंमत आवडलेली नाही हे त्यांच्या देहबोलीवरूनही सिद्ध होते. मुळात नाना पटोले प्रदेशाध्यक्षपदावर असताना त्यांनी या प्रकारचे विधान केले असते, तर त्याला काही अर्थ प्राप्त झाला असता. पण इतर कोणत्याही नेत्यांना विश्वासात न घेता त्यांनी अशा प्रकारचे विधान केल्यामुळे नाराजी निर्माण होणे साहजिक आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जरी ही ऑफर गंभीर होती असे मानले तरी महाविकास आघाडीचे इतर घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्याकडून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे स्वागत झाले असते का, हे कसे गृहीत धरता येईल? तरीही संजय राऊत यांनी आपल्या नेहमीच्या शैलीमध्ये या ऑफरवर प्रतिक्रिया व्यक्त करून जी मुळात गंमत होती ती गंमत अधिकच ताणण्याचा प्रयत्न केला.

अनेक वेळा आपल्या राजकीय नीतीचा भाग म्हणून राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते संभ्रमाचे वातावरण निर्माण करत असतात. यानिमित्ताने जी चर्चा निर्माण होते त्यामुळे काही काळ खळबळ माजते आणि संशयाचे वातावरण वाढू लागते. त्याचाच एक भाग म्हणून या सर्व राजकारणाच्या गमतीकडे पहावे लागणार आहे. एकनाथ शिंदे यांनी या गमतीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना काँग्रेस सोबत जाण्याचा प्रश्नच नाही असे म्हटले. अजित पवार यांनी मात्र याबाबत काहीही भूमिका घेतलेली नाही. कारण या प्रकारच्या गमतीकडे दुर्लक्ष करण्याचेच त्यांनी आजपर्यंत धोरण स्वीकारले आहे. एकीकडे राजकारणातील ही गंमत सुरू असतानाच दुसरीकडे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते जयंत पाटील यांनीसुद्धा अशाच प्रकारची गंमत सुरू केलेली दिसते. 'माझे आता मन लागत नाही. मला फारसे महत्त्वही नाही' अशा आशयाचे विधान त्यांनी पक्षाच्या व्यासपीठावरूनच केले आहे. एकीकडे जयंत पाटील लवकरच शरद पवारांची साथ सोडून अन्य कोणत्या पक्षामध्ये जातील अशा प्रकारची चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांचे हे विधानही सूचक मानावे लागेल. अर्थात, अजूनतरी जयंत पाटील यांनी आपण गमतीने ते विधान केले असे म्हटलेले नाही आणि जयंत पाटील यांची नाराजीसुद्धा लपून राहिलेली नाही. सध्या सत्तेवर असलेली महायुती भक्कम असल्याने उर्वरित पाच वर्षे आपल्याला विरोधी बाकांवरच बसावयाचे आहे याची कल्पना असल्यानेच केवळ स्वप्नरंजन म्हणून अधूनमधून राजकारणात अशी गंमत केली जाते असे दिसते.

सोशल मीडियाचा प्रभाव असलेल्या सध्याच्या जगामध्ये काय खरे आणि काय खोटे याचे भान नसणारे सोशल मीडियाचे वापरकर्ते मात्र अशा प्रकारच्या गमतीवर विश्वास ठेवून ती सीरियसली घेतात आणि समाजात आणि राजकारणात विनाकारण संभ्रमाचे व संशयाचे वातावरण निर्माण होते हेसुद्धा या ठिकाणाहून नाकारून चालणार नाही. राजकारण गंमत नसून सीरियस आहे हे यानिमित्ताने सर्व राजकारण्यांना कळले तरी खूप झाले.

बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

प्रबोधन

राष्ट्रजीवन

उठा ग्राहकांनो । व्हा रे संघटित

१५ मार्च या जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने महात्मा गांधीजींच्या एका विचारांचं चिंतन करणं आवश्यक आहे. दुकानदारांना हा थोर पुरुष ठणकावून सांगतो, 'ग्राहक ही दुकानात येणारी सर्वश्रेष्ठ व्यक्ती होय. ग्राहक आपणावर अवलंबून नसून आम्ही त्याच्यावर अवलंबून आहोत. ग्राहक हा आमच्या कामातील अडथळा नसून ग्राहक हाच आमच्या कामाचा हेतू आहे. त्याची सेवा करून आम्ही त्याच्यावर मेहेरबानी करीत नसून आम्हाला सेवेची संधी देऊन तो आमच्यावर मेहेरबानी करतो. ' म्हणून अमेरिकेच्या ग्राहकांचे ॲडव्होकेट राल्फ नेडर यांनी महात्मा गांधीजींचं वर्णन जगातील ग्राहकहितांचा सर्वश्रेष्ठ समर्थक अशा गौरवपर शब्दांत केलं आहे.

भारतीय ग्राहक चळवळीचे प्रणेते बिंदूमाधव जोशी यांनी ग्राहकाचं वर्णन करताना महात्मा गांधीजींचा विचार केंद्रस्थानी ठेवलेला आहे. त्यांच्या मतानुसार, ग्राहक हा राजा आहे, ग्राहक ही लोकशाहीची प्राणशक्ती आहे आणि ग्राहक हेच खरं भांडवल आहे. तात्पर्य, ग्राहक ही असाधारण शक्ती आहे. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा मूलाधार आहे. ग्राहकाला न्यायमूर्ती छगला Kingpin of democracy असं म्हणतात. मतदार हे लोकशाहीचे ग्राहक असल्यामुळे त्यांच्याशिवाय लोकशाही अस्तित्वात येतच नाही आणि ग्राहक नाही, तर उत्पादन अस्तित्वात येत नसल्याने ग्राहक हेच भांडवलं, असं म्हणणं आवश्यक आहे.

महात्मा गांधीजींनी केलेला उपदेश स्वार्थांध व्यापाऱ्यांना माणुसकी शिकवू शकेल का? मुळात गब्बरसिंग व्यापारी-उत्पादक आणि गरीबदास, भिकारीदास, कंगाल गिऱ्हाईक यांच्यात सामंजस्य शक्य नाही. कारण ही लढाई दोन असमान घटकांतील आहे आणि निदान भारतीय अर्थव्यवस्था भारतीय लोकशाहीसारखीच गब्बरसिंगांचीच बाजू घेणारी आहे. ती ग्राहकहित कधीच जपू शकणार नाही. उत्पादकाच्या नफेखोरीबद्दल प्राचार्य पी.बी.पाटील चिंता व्यक्त करताना म्हणतात, 'खुल्या बाजारव्यवस्थेवर खुलं मुक्त जग निर्माण करणं म्हणजे जंगली व्यवस्थेकडे जाणं आहे' याउलट, ज्या अमेरिकेत ग्राहक चळवळीची स्थापना झाली, ती अमेरिका, चीन, मलेशिया इत्यादी देशांनी नवा आर्थिक विचार आपल्या देशाला योग्य ठरेल, अशाप्रकारे नवं रूप देऊन स्वीकारला. म्हणजेच ग्राहकहित पायदळी तुडवलं जाणार नाही, याची काळजी घेतली.

खरं तर, जगातील आपण सारीच माणसं ग्राहक आहोत. त्यामुळे ग्राहकाच्या हक्काविषयी आपण दक्ष असलं पाहिजे, यात वाद नाही. शिवाय आपल्या पाठीशी अमेरिकेतील ग्राहक चळवळीचा इ.स. १९००पासूनचा ११२ वर्षांचा इतिहास आहे. ॲप्टॉन सिंक्लेअर आणि हार्वे यांनी राष्ट्रीय ग्राहक चळवळ संघटना त्याच वर्षी स्थापन केली होती. भारतातही १९३०ला वस्तूच्या विक्रीचा कायदा करण्यात आला होता. १९५४ मध्ये अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा करण्यात आला. १९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा ग्राहकांच्या तक्रारी दूर करण्यासाठी अंमलात आला. या कायद्याचं वैशिष्ट्य म्हणजे शासनाने ठरवलं, कायदा केला असं या कायद्याबाबत न घडता लोकांनी ठरवलं, कायदा बनवला व शासनाने तो स्वीकारला, असा उलट प्रकार झाला आहे. ३१ कलमांचा हा कायदा ग्राहक हक्काचं संरक्षणही करतो आणि आदेशाविरुद्ध वागणाऱ्यांना ग्राहक न्यायालयाद्वारे कठोर दंड व शिक्षाही करतो. ग्राहक न्यायालय फारच सोप्या रीतीने काम करतं. वकील नको, स्टॅम्प ड्यूटी नको, कोर्ट फी नको अर्थात, विनाखर्च न्याय हे ग्राहक न्यायालयाचं खास वैशिष्ट्य आहे. जिल्हा न्यायमंच, राज्य न्यायमंच आणि राष्ट्र न्यायमंच अशी त्रिस्तरीय रचना आज कार्यरत आहे. अशा रीतीने तांत्रिकतेच्या जंजाळातून ग्राहकांना मुक्त करून त्यांचे श्रम, वेळ, पैसा वाचवून जलद न्याय देणारी ही यंत्रणा, हे ग्राहकांना मिळालेलं वरदान आहे.

मात्र आपल्या देशात कुठलेच ग्राहक संघटित नाहीत. बऱ्याच ग्राहकांना न्याय कसा मिळवावा, याची माहिती नाही. भारतीय ग्राहकाचा सर्वात मोठा दोष आहे, त्याचा भाग्यवादीपणा! त्यामुळे तो उदास मनाने जगतो. काही ग्राहक बेफिकीर आहेत, काही परिस्थितीने अत्यंत गांजलेले-त्रस्त आहेत आणि काही करायला गेलो एक आणि उलटं झालं तर? म्हणून घाबरणारे ग्राहक आहेत. त्यामुळे संघटित, धूर्त, चलाख विक्रेत्यांचं फावतं आणि ग्राहक चळवळीचं कार्य अपूर्ण राहातं. विमा कंपन्यापासून गॅस कंपन्यांपर्यंत, हॉटेल व्यवसायापासून औषधनिर्मात्यापर्यंत, शिक्षणसंस्थापासून शासकीय नोकरांपर्यंत सारेच ग्राहकांना लुबाडतात. या सर्वांशी टक्कर देणं शक्य नसतं. नको ते विषय आणि अर्थहीन मजकूर छापणारी वृत्तपत्रं ह्यांना लुटारू का म्हणू नये? देवीला द्यायची साडी दोन मीटरने कमी, चांदीच्या देवीच्या मूर्तीत ४० टक्केच चांदी आणि मंदिरात व्हीआयपी दर्शन ही भाविकांची फसवणूक नाही का? ग्राहक चळवळ मंदिर-मठातील साठलेल्या पैशांपर्यंत पोहोचली तरच ती पूर्ण झाली, असं म्हणता येईल. पण तिच्या पूर्णत्वासाठी राष्ट्र समर्थ, विज्ञाननिष्ठ असावं लागतं. कारण-

ओसाडवाडीचा । धनगर राजा ।
तसा दुजा राजा । ग्राहक हा ॥ १
ग्राहका म्हणती । देशाचा आधार ।
परी हा आधार । अधांतरी ॥२
भांडवल आहे । ग्राहक देशाचा ।
मूळ मुद्दलांचा । पत्ता नाही ॥ ३
गांधीजींनी नीती । व्यापाऱ्यां कथिली।
सोनारे फुंकिली । नळी कानी ॥४
ग्राहक एकाकी । दुबळा, अज्ञानी ।
खाल्ला कंपन्यांनी । त्याला पूर्ण ॥५
न्यायालय आहे । ग्राहक रक्षणा ।
नाही ग्राहकांना । त्याचे ज्ञान ६
संघटना हेच । बळ ग्राहकांचे ।
चक्र शोषणाचे । थांबविण्या ॥७
उठा ग्राहकांनो । व्हा रे संघटित ।
साधा देशहित । आणि सौख्य ॥८

प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

सोलापूरातील बंद असलेले जलतरण तलाव सुरू करा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरांमध्ये मार्कंडेय जलतरण तलाव सावरकर जलतरण तलाव व विजापूर रोडवरील आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव असून सध्या सावरकर जलतरण तलाव काही प्रमाणात सुरू असून बाकीचे दोन्ही जलतरण तलाव बंद अवस्थेत आहेत आणि जलतरण तलावाची दुरवस्था मोठ्या प्रमाणात झाली आहे सध्या उन्हाळ्याचा कालावधी सुरू असून शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या पडल्यावर अनेक विद्यार्थी पोहणे शिकण्यासाठी गर्दी करतात पण दोन्ही तलाव बंद असल्या कारणामुळे त्यांची गैरसोय होत आहे महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व अधिकाऱ्यांच्या बेफिकीर वृत्तीमुळे हे जलतरण तलाव बंद आहेत त्यामुळे तात्काळ आपण हे दोन्ही जलतरण तलाव सुरू करण्याबाबत आदेश द्यावेत.

सोलापूर शहरात विजापूर रोडवर आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या वतीने बांधण्यात आलेला होता तो तलाव महानगरपालिकेने

काही काळासाठी ताब्यात घेतला होता पण कर्मचाऱ्यांच्या व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तलावाला गळती लागून व त्याची दुरावस्था होऊन तो बंद आहे याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे संपर्क साधला असता त्यांनी असे उत्तर दिले की आम्ही महानगरपालिकेकडे वर्ग करताना सुस्थितीत जलतरण तलाव हस्तांतरित केला होता जर महानगरपालिकेला तो चालवणे होत नसल्यास आम्हाला आम्ही दिलेल्या सुस्थितीमध्ये तलाव आमच्याकडे वर्ग करावे तरच आम्ही तो जलतरण तलाव सुरू करू तर महानगरपालिकेने आम्ही जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे तो जलतरण तलाव वर्ग केला आहे असे सांगितले दोघांच्या चालढकलीमध्ये सर्वसामान्य जनतेचे नुकसान होत असून तात्काळ जलतरण तलाव सुरू केल्या संभाजी ब्रिज स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले संपर्कप्रमुख छत्र गुण माने शहराध्यक्ष शिरीष जगदाळे कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर लखन पारसे अकबर शेख संघटक शेखर स्वामी राजेंद्र माने उपाध्यक्ष सतीश वावरे चंद्रशेखर कंटीकर सिद्धाराम साबळे आधी उपस्थित होते.

अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवा - नीतेश कराळे

अकलूज (कटूसत्य वृत्त):- सध्या जनतेला चहूबाजूने घेरले जात आहे. जनतेची शुद्ध फसवणूक सुरू आहे या होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधात जनतेने आवाज उठवला पाहिजे.महत्त्वाचे प्रश्न दडपण्यासाठी विविध विषय उकरून सरकार लोकांची दिशाभूल करताना दिसत आहे यावर लोकांनी आता जागृत राहून आवाज उठवला पाहिजे असे मत फिनिक्स अकॅडमीचे संचालक तथा सुप्रसिद्ध व्याख्याते नितेश कराळे मास्तर यांनी व्यक्त केले.

अकलूज येथे प्रतिवर्षीप्रमाणे मूकनायक प्रतिष्ठानच्यावतीने मूकनायक परिसंवाद या कार्यक्रमाचे रविवार दिनांक १६ मार्च रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर नलावडे

पुस्तके खरेदीसाठी झुंबड...

सदरच्या परिसंवाद कार्यक्रमात वैचारिक पुस्तकांची विक्री करण्यासाठी बुक स्टॉल उभा करण्यात आले होते याचा लाभ सर्वांनी घेतला. सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध झाल्याने असंख्य वाचकांनी या ठिकाणी विविध पुस्तकांची खरेदी केली जवळपास या कार्यक्रमातून सव्वा लाख रुपयांची पुस्तके वाचकांनी नेली. पुस्तके खरेदी करण्यासाठी अक्षरशा झुंबड उडालेली दिसली.

हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कराळे मास्तर हे बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रतिमा पूजन करून पूज्य भंतेजी गोविंदो मानदो यांचेकडून त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागेश लोंढे यांनी केले.

तदनंतर उपस्थित मान्यवरांचा मूकनायक प्रतिष्ठानच्यावतीने यशोचित सन्मान करण्यात आला.

विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या मान्यवरांना याप्रसंगी मूकनायक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यामध्ये पत्रकार क्षेत्रातील उत्कृष्ट पत्रकारिता हा पुरस्कार एल डी वाघमोडे, साहित्य क्षेत्रातील पुरस्कार बा ना धांडोरे, विधिज्ञ क्षेत्रातील पुरस्कार ॲड सुमित सावंत तर शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार सुनंदा काटे वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल शाहीर राजेंद्र कांबळे खुडुसकर यांनाही विशेष सन्मान करून गौरवण्यात आले.

यावेळी अध्यक्ष भाषणात डॉक्टर पांडुरंग नलावडे यांनी उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन केले. याप्रसंगी पुढे बोलताना कराळे मास्तर म्हणाले की, सध्या देशातील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वतंत्र कार्य करणाऱ्या शासकीय संस्थांचा मोठ्या प्रमाणात गैरवापर सुरू असून देशामध्ये आराजकता माजेल अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे त्यामुळे लोकांनी सजग नागरीकाप्रमाणे वागून या देशासाठी जागरूक राहणे गरजेचे वाटू लागले आहे.न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडाला पाहिजे अशी कृत्ये सरकार करताना दिसत आहे. मूकनायक प्रतिष्ठानने या कार्यक्रमाचे आयोजन करून समाजासमोर आदर्श घालून दिला आहे असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

मूकनायक प्रतिष्ठान अकलूजच्या वतीने मागील तीन वषार्पासून विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेतील योगदानाला उजाळा मिळावा यासाठी समता सैनिक दल प्रमुख, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मूकनायक प्रतिष्ठानची स्थापना केली. वैचारिक आणि सामाजिक प्रबोधन पर अशा कार्यक्रमाचे आयोजन करून या प्रतिष्ठानने आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मूकनायक प्रतिष्ठानचे पत्रकार बांधव डी एस गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, सागर खरात,सुजित सातपुते, कैलास कांबळे यांनी परिश्रम घेतले. तर शेवटी आभार आनंदकुमार लोंढे यांनी मानले.

पान १ वरून

बर्ड फ्लू संसर्ग प्रतिबंधासाठी...

सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले. प्रारंभी पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर येवले यांनी सोलापूर महापालिका हद्दीत छत्रपती संभाजी नगर तलाव व किल्ला बाग परिसरात कावळा बगळा इत्यादी पक्षी नैसर्गिक मृत्यू झाल्याचे आढळून आल्याने त्यांचे नमुने तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आलेले होते त्यानुसार त्यांच्या अहवाल पॉझिटिव्ह आल्याने हा परिसर बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. तसेच या ठिकाणी कृती आराखडा याप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसर एक किलोमीटर परिघातील 74 नमुने तर झिरो ते दहा किलोमीटर परिघातील 126 नमुने घरगुती पक्षी प्राण्याचे घेऊन पुणे येथील प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवण्यात आल्याचे सांगून बर्ड फ्लू हा संसर्ग जंगली पक्षांमध्ये झालेला असून घरगुती पक्षांचे नमुने तपासणी अहवाल उद्या प्राप्त होणार असल्याची माहिती डॉ. येवले यांनी यावेळी दिली.

या आजाराच्या अनुषंगाने नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही परंतु बाधित क्षेत्रातील चिकन शॉप बंद करण्यात आलेले आहेत. या परिसरातून चिकन खरेदी करू नये. तसेच कोणत्याही ठिकाणाहून चिकन खरेदी केल्यानंतर ते 100 डिग्री तापमानावर व्यवस्थित शिजवून खावे. अंडी बॉईल करून खावेत. बाधित क्षेत्रात नागरिकांनी जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

सर्व जिल्ह्यातील ऊस तोडणी कामगारांसाठी एक खिडकी योजना राबवा : उपसभापती गोऱ्हे

मुंबई (कटूसत्य वृत्त):- मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील ऊस तोडणी कामगारांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागातील अधिका-यांचा समावेश करून विकास व सहाय्य समिती स्थापन करावी. ऊस तोडणी कामगारांसाठी शासनाच्या सर्व योजना एकाच प्लॅटफॉर्मवर देता येतील यासाठी एक प तयार करावे, ट्रॅकींग सिस्टीम, रेशनची पोर्टिबिलीटी यासारख्या अत्याधुनिक यंत्रणेच्या सहाय्याने योजना राबवण्यावर भर द्यावा. बीड जिल्ह्याप्रमाणे इतर जिल्ह्यातही काम करावे. अपघातग्रस्त ऊस तोडणी कामगारांना तात्काळ मदत देण्यात यावी अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केल्या. विधानभवन येथे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हयातील गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांसंदर्भात गठीत समिती अहवाल - मंत्रालयीन विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत बैठक झाली. यावेळी या बैठकीला दूरदृश्यप्रणालीद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त अमगोथु रंगानाईक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र गोरवे, साखर आयुक्त दीपक तावरे,

धाराशिव जिल्हाधिकारी कितीर्कुमार पुजार, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणीचे जिल्हाकारी रघुनाथ गावडे, बीडचे जिल्हाधिकारी आविनाश पाठक, लातुरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पुणे विभागीय आयुक्तालयाचे अतिरिक्त आयुक्त आर.आनंदकर, महिला व बालविकास विभागाचे सहसचिव विलास ठाकूर, महिला व बालविकास सहआयुक्त राहुल मोरे, आरोग्य विभागाचे डॉ.अमोल भोर, कामगार विभागाचे संकेत कानडे यावेळी उपस्थित होते.

उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, बीड जिल्ह्यात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणावर झाल्याच्या घटना निदर्शनास आल्यानंतर राज्य शासनाने २६ जून २०१९ रोजी समिती स्थापन केली होती.गेल्या तीन वर्षांत बीड जिल्ह्यातील खासगी रुग्णालयांमध्ये गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबत समितीने तपासणी केली. सामाजिक न्याय विभाग, महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभाग, साखर आयुक्त, कामगार आयुक्त, आरोग्य विभागाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था यांनी यामध्ये प्रभावीपणे व समन्वयाने काम करावे. तसेच या विभागांना येणा-या अडचणींचा अहवाल तात्काळ पाठवावा जेणेकरून यामध्ये असणाऱ्या त्रुटीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना धोरणात्मक निर्णय घेवून ठरविता येतील.

वात्रटिका

नुसत्याच उचापती

राजकारणात आज काल
अक्कल कमी नक्कल चालते...
इतिहास माहीत नसणारी
व्यक्ती तोंड भरून काही बोलते...
नव्हते तसे आज सांगितले
शहाण्यांनी छत्रपती...
उंचीपेक्षा जीभ चालते आणि
नुसत्याच उचापती...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No .MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHM

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे - चेतनसिंह केदार सावंत

सांगोला (कटूसत्य वृत्त):- आगामी निवडणुका तसेच बदललेल्या राजकीय परिस्थिती लक्षात घेता भाजपने आता संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रित करत, त्या माध्यमातून आगामी निवडणुकासाठी तयारी सुरू केली आहे. त्यासाठी विविध कार्यक्रम देण्यात आले आहेत. संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी बुथ समित्या अधिक सक्षम करा, सदस्य नोंदणी मोहिम, पक्षाने दिलेले कार्यक्रम अधिक व्यापक नियोजन करुन यशस्वी करावे अशा सूचना कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. भारतीय जनता पाटीर्ची ध्येय धोरणं समाजातील तळागाळातील घटकापर्यंत पोहोचवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.

जिल्ह्यातील आगामी निवडणुकीसाठी सज्ज राहण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर, जिल्हा प्रभारी विक्रम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. राज्यातील सर्वाधिक सदस्य नोंदणी सोलापूर जिल्ह्यात झाल्याने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच संघटनात्मक निवडी करण्यासाठी मंडल स्तरावर बैठका सुरू आहेत.

यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत म्हणाले की, तळागातील लोकांमध्ये भाजपाचे ध्येय धोरण रुजविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी काम करावे. भाजप पक्षामध्ये पक्षसंघटनेला फार महत्त्व आहे. गावपातळीवरील कार्यकर्ता हा भाजपचा महत्त्वाचा दुवा आणि ताकद आहे. पक्षसंघटना बांधणीला सर्वाधिक महत्त्व असल्यामुळे त्या माध्यमातून कार्यकर्त्यांना पदे देऊन काम करण्याची संधी दिली जाते. वशिला किंवा जवळचा म्हणून कोणालाही पद दिले जात नाही, याची नोंद कार्यकर्त्यांनी घेऊन पक्षसंघटना वाढीसाठी आपला वेळ द्यावा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले. भाजपने विकास कामांच्या जोरदार संपूर्ण महाराष्ट्रात पक्षाची पकड मजबूत केली आहे.

भाजपचे बुथस्तर व गावागावात पोहचलेले संघटन हे कार्यकर्त्यांच्या बळाचे फलीत आहे. पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राबविलेल्या योजना व निर्णय हे कार्यकर्त्यांना बळ देणाऱ्या आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. कार्यकर्त्यांनी जागरूक राहून काम करावे. सक्षम कार्यकर्ता हीच भाजपची खरी ताकद असल्याचे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले.

आदिती तटकरेंचा वाढदिनी ईच्छा भगवंताची परिवाराकडून सत्कार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्याचे महिला व बालकल्याण मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आदिती तटकरे यांचा वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक किसन जाधव यांनी रायगड जिल्ह्यातील सुतारवाडी येथील गीताबाग या निवासस्थानी नामदार आदितीताई तटकरे यांची भेट घेऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतील पिंक कॅम्पेन अंतर्गत त्यांना पिंक शाल, अक्कलकोट निवासी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रतिमा तसेच भला मोठा हार घालून त्यांना

वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी माजी आमदार अनिकेत भाई सुनील तटकरे यांचा देखील यावेळी किसन जाधव यांनी मखमली टोपी, शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. दरम्यान यावेळी किसन जाधव यांनी सोलापूर महानगरपालिका विभागातील लाडकी बहीण योजनेचा लाभ सर्वसामान्य महिलांना मिळावा यासाठी योजना यशस्वी राबविणाऱ्या आशा वर्कर्स यांचा मानधन काही दिवसापासून थकीत आहे ते मानधन लवकरात लवकर मिळावी अशी विनंती नामदार आदितीताई तटकरे यांच्याकडे केली तत्काळ यावर आपण आशा वर्कर्स यांचा प्रलंबित मानधनाचा प्रश्न सोडवू अशी ग्वाही यावेळी महिला बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी किसन जाधव यांना दिली. या सत्कार सोहळ्याप्रसंगी राष्ट्रवादी सोलापूर शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, सरचिटणीस संतोष गायकवाड हुडको, महादेव राठोड, दीपक आरगेल, आनंद गाडेकर यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे सदस्य पदाधिकारी आदींची उपस्थिती होती. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे साहेब यांच्या सूचनेनुसार आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बळकटीसाठी सभासद नोंदणी मोठ्या प्रमाणात राबवा. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे वर्चस्व राहील यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत अशा सूचना देखील यावेळी महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे यांनी किसन जाधव यांना दिली.

जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत मंगळवेढ्याचा गायकवाड तर माळशिरसच्या माने यांची निवड

अकलूज (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा तालीम संघ व महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटने च्यावतीने आयोजित महाराष्ट्र केसरी सोलापूर जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत खुल्या गटात मंगळवेढ्या चा महेंद्र गायकवाड (माती)तर माळशिरसचा शुभम माने (मॅट)या विजेता मल्लांची महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड झाली. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परीषदेव्या मान्यतेने कर्जत येथे २६ मार्च ते ३० मार्च २०२५ कालावधीत होणाऱ्या ६६ व्या वरिष्ठ राज्य अर्जिक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती लढत स्पर्धा २०२४- २५ साठी सोलापूर जिल्हा तालीम संघ आयोजित व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदे चे उपाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटने च्या नियोजनाखाली अकलूज येथील धवल श्रीराम मंदिर,धनश्री नगरात १५ व १६ मार्च २०२५ दरम्यान सोलापूर जिल्हा निवड चाचणी स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते.या निवड चाचणी स्पधेर्चा शुभारंभ सोलापूर तालीम संघाचे अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तालीम संघाचे उपाध्यक्ष सर्जेराव चवरे, रावसाहेब (छोटा) मगर, मारुती वाकडे, महादेव भंडारे, महादेव ठवरे, प्रताप झंजे, वामन उबाळे, भारत मेकाले, विलास कंडरे, अभिमन्यू डमरे, भारत भोसले, केदार साखरे, नरसिंह कुलकर्णी, सचिन भोपळे, ज्ञानदेव पालवे, अण्णासाहेब शिंदे सुदर्शन मिसाळ, आण्णासाहेब इनामदार, सुदर्शन मिसाळ, नवनाथ साठे, नारायण माने, मयुर माने,

संग्राम भोसले, नेताजी काळकुटे शहाजी आगाडे उपस्थित होते.

या निवड चाचणी स्पधेर्तील खुल्या गटात अंतिम लढत (माती) विभागात महेंद्र यकवाड (मंगळवेढा) विरुद्ध आदित्य कोकाटे (माळशिरस) यांच्यात झाली. या कुस्तीत महेंद्र गायकवाड तर मॅट विभागात अंतिम कुस्ती शुभम माने माळशिरस विरुध्द आदित्य गवसणे अकलूज यांच्यात होवुन शुभम माने महाराष्ट्र केसरी मॅट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.विजेत्यांना माजी आ.रामभाऊ सातपुते,डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, डॉ.धवलसिंह मोहिते पाटील महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, प्रा.रामभाऊ झोळ, भाऊसाहेब आंधळकर, श्रीकांत देशमुख, मच्छिंद्रभाऊ ठवरे, शरदबापू मोरे, प्रदिप जगदाळे, शशांक पवार, सुधीर लांडे, भिमराव बाळगी, यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. स्पधेर्तील वजन गटात मॅट ५७ किलो वैभव यळगुंडे (सोलापूर), ६१ किलो करण माने (पंढरपूर), ६५ किलो ज्योतिबा अटकळे (पंढरपूर), ७० किलो किरण संत्रे (पंढरपूर), ७४ किलो विकास करे (माळशिरस), ७९ किलो शुभम मगर (माळशिरस), ८६ किलो रोहित निटवे (माळशिरस), ९२ किलो शिवराज डोंबाळे (माळशिरस), ९७ किलो शंकर बंडगर (माढा), वजन गटातील माती ५७ किलो विशाल सुरवसे (माढा), ६१ किलो अजय भुसनर (माळशिरस), ६५ किलो अनिकेत मगर (माळशिरस), ७० किलो ऋषीकेश पवार(पंढरपूर),७४ किलो तुषार झंजे (माळशिरस), ७९ किलो प्रणव हांडे (माळशिरस), ८६ किलो बिरुदेव बनसोडे (मोहोळ),९२ किलो अर्जुन काळे (करमाळा), ९७ किलो श्रीनिवास पाथरुठ (मोहोळ) यांची निवड झाली.

यावेळी मल्लसम्राट रावसाहेब आप्पा मगर पंचायत समिती सदस्य गौतम माने, ज्ञानदेव लोखंडे, महादेव ठवरे सजेर्राव चवरे नामदेव नाना वाघमारे,भारत मेकाले, हिम्मत सोलंकर ॲड. सोमनाथ अण्णा वाघमोडे, विजय जवळकर भानुदास सालगुडे पाटील, आप्पा टिळे सजेर्राव घोडके अण्णा कदम, आप्पासाहेब वाघमोडे आण्णासाहेब गायकवाड झुंजार सोलंकर दादा पाटील प्रवीण मगर सोमनाथ भोसले आप्पा मगर प्रताप झंजे मिलिंद सरतापे,दादा पाटील, अभिषेक कांबळे, मारुती पाटील, गोरख पवार, दत्तात्रय मगर, दत्ता मगर सागर मोटे सतीश नाना पालकर अण्णासाहेब शिंदे सुदर्शन मिसाळ नवनाथ साठे सुधीर रास्ते मयूर माने, राजाभाऊ गुळवे, सचिन पाटील, पिंटू वैद्य, दादा नामदास विकास शिंदे संग्राम भोसले, जयसिंग मोरे, बापू मगर, बाळासाहेब कोकाटे, विवेक गवळी,बापू कोकाटे,शहाजी आघाडे, विठ्ठल इंगळे, राहुल जाधव, प्राचार्य रज्जाक शेख, यांचे सह सोलापूर जिल्हा तालीम संघ व महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना सर्व पदाधिकारी उपस्थित होते. स्पधेर्साठी पंचाचे काम रवी बोत्रे,बाळू मेटकरी,अक्षय टिळेकर, धनराज भुजबळ,बापू लोखंडे, राजेंद्र कणसे, सचिन ऐवळे, प्रकाश घोरपडे, गणेश मगदूम यांनी केले तर निवेदन युवराज केचे व हणमंत शेंडगे यांनी केले.या कार्यक्रमाचे नियोजन ज्ञानदेव पालवे,नारायण माने यांनी केले.

अनु. जाती आरक्षण उप वर्गीकरणासाठी पाच लक्ष समाज बांधवासह आझाद मैदान येथे महाआंदोलनाचा निर्धार

मुंबई (कटूसत्य वृत्त):- सकल मातंग समाजाची राज्य पातळीवरील बैठक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,(सभागृहात) मंत्रालय जवळ ,मुंबई येथे 12/3/2025 रोजी पार पडली. या बैठकीत अनुसूचित जातीचे आरक्षण उप वर्गीकरण करण्यासाठी राज्य सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी राज्यभरातील पाच लाख समाज बांधवासह महा आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला. माजी आमदार नामदेवराव ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या बैठकीत पद्मश्री मिलिंद कांबळे,माजी गृह राज्यमंत्री, रमेश जी बागवे, माजी कॅबिनेट मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माझी कॅबिनेट मंत्री दिलीप कांबळे, माजी आमदार सुधाकर भालेराव, माजी आमदार गुंडेले, माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार राजीव आवळे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय नेते रवींद्र दळवी, लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक विष्णू कसबे, आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, माजी आमदार नामदेव ससाने, सचिन साठे, तसेच महाराष्ट्रातील जवळपास

सर्व संघटनेचे पदाधिकारी, कर्मचारी बांधव, संघटना व राजकीय नेते, कर्मचारी बांधव, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिक माहिती देताना सकल मातंग समाज राज्य समन्वयक सुरेश पाटोळे म्हणाले की,' सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी देशातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणाबाबत ऐतिहासिक निर्णय दिला आहे. अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाच्या अंतर्गत राज्य सरकारला उपवर्गीकरण करता येऊ शकतं, असं न्यायालयाने या निर्णयात म्हटलं आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती पैकी सर्व जाती जमातींना नोकऱ्या व शिक्षणातील आरक्षण समन्यायीपणे मिळावे हा सर्वोच्च न्यायालयातील सात न्यायमूर्तीच्या खंडपीठाने दिलेल्या निकालाचा मिथितार्थ होता. गेल्या ७५वर्षात महाराष्ट्रात मातंग या महादलित समाजाला आरक्षणाचा लाभ मिळाला नाही. सामाजिक न्यायाची प्रभावीपणे अंमलबजावणी येत्या काळात महाराष्ट्र राज्यात होण्यासाठी अनुसूचित जातीचे आरक्षण वर्गीकरणा संदर्भात महायुती सरकारने न्या. अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली न्यायिक आयोग १५ ऑक्टोबर २०२४ रोजी नेमला आहे. अद्याप या आयोगाने आपला अहवाल सादर केला नाही.

याआयोगास काल रोजी आठ महिने मुदतवाढ देण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे,

या शासन निर्णयामध्ये सुस्पष्टपणे अनु.जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे आणि त्याचे प्रारूप तयार करणे असा उद्देश प्रस्तावनेतच स्पष्ट केला आहे. त्यामुळे या समितीला ईम्परीकल डाटा प्राप्त करून जातींची सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि आरक्षणाचा मिळालेला लाभ या आधारे अनु.जातीच्या आरक्षणात अ, ब, क, ड किंवा अ, ब, क किंवा समितीच्या मता प्रमाणे निश्चित प्रारूप तयार करून अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. न्यायिक समितीच्या शिफारसीची अंमलबजावणी करून वर्गीकरणाची प्रक्रिया त्वरित राबवण्यासाठी महाआंदोलन करण्याचा निर्धार सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने घेण्यात आला आहे.'असे राज्य समन्वयक सुरेश पाटोळे यांनी सांगितले,

सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य समन्वयक सुदाम धुपे, बाबुराव मुखेडकर मारुती वाडेकर, सुरेश पाटोळे, पंडित सूर्यवंशी, डॉ.रमेश साळवे, अँड.राम चव्हाण, कैलास डाखोरे, रणधीर कांबळे, भास्कर नेटके, अशोक लोखंडे, रमेश शिंदे, सुरेश साळवे, गुलाब साठे यांनी ही बैठक आयोजित केली होती.

नियोजनाच्या बैठकीला महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून चार ते पाच बांधव हजर होते. जवळपास दीडशे मातंग समाज समन्वयक हजर होते.

नावात बदल

मी माझे नाव **सोहन चौधरी** वरून **सोहनलाल चौधरी** करत आहे. प्लॉट नंबर ३०५, हरे कृष्ण विहार, विजापूर रोड, सोलापूर, पिन - ४१३००४ असे केले आहे. तरी मला आज पासून माझ्या नवीन नावाने ओळखावे. मो. ९३२६९३३३३४

उन्हाची तीव्रता वाढत असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचा निर्णय

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- उन्हाची तीव्रता वाढत असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचा निर्णय झाला. १० मार्चपासून शाळा सकाळी साडेसात ते दुपारी साडेबारा या वेळेत भरत आहेत. मात्र, पाच दिवसांपासून जिल्ह्यातील तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. या काळातील तापमान ४० अंश सेल्सिअसहून अधिक राहिले आहे. या पार्श्वभूमीवर आता शाळा सुटण्याची वेळ कमी करण्याची तयारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दर्शविली आहे. शिक्षणाधिकाऱ्यांशी बोलून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले. त्यानुसार शाळा सुटण्याची वेळ पावणेबारा किंवा बारा अशी होईल.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीची बैठक काही दिवसांपूर्वी झाली, त्यात सोमवारपासून (ता. १०) शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचा निर्णय झाला. त्यानुसार माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप म्हणाले, आमच्या विभागाकडील शाळांची वेळ सकाळी साडेसात ते दुपारी बारापर्यंत आहे. मात्र, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक

शाळांची वेळ सकाळी साडेसात ते दुपारी साडेबारापर्यंत आहे. त्यामागे विद्यार्थ्यांना अधिकाधिक अध्यापन व्हावे हा हेतू आहे, पण जिल्ह्यात दोन हजार ७७७ जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये एक लाख ९८ हजारांवर विद्यार्थी आहेत. त्यातील बरेच विद्यार्थी वाड्या-वस्त्यांवरून गावातील शाळेत येतात.

दुपारी साडेबारा वाजता शाळा सुटल्यावर त्यांना घरी जायला किमान १५ मिनिटे तरी लागतात. अनेक विद्यार्थी कौटुंबिक परिस्थितीमुळे अनवणी येतात. त्यामुळे शाळा सुटण्याची वेळ नेमकी उन्हाचा पारा वाढलेला असतो तेव्हाचीच आहे. जिल्ह्यातील तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने शाळा सुटण्याची वेळ कमी करावी, अशी मागणी पालकांसह शाळा व्यवस्थापन समित्यांची देखील आहे. त्यावर दोन दिवसांत निर्णय अपेक्षित आहे.

सात दिवसांतील तापमान-तारीख तापमान १० मार्च ३७.६ अंश, ११ मार्च ३८.६ अंश, १२ मार्च ३९.४ अंश, १३ मार्च ४०.८ अंश, १४ मार्च ४१.१ अंश, १५ मार्च ४०.३ अंश, १६ मार्च ४०.४ अंश.

वाढत्या तापमानामुळे उन्हात घराबाहेर पडू नका मानवाच्या शरीराचे सरासरी तापमान ३८ अंशापर्यंत असते. प्रत्येक व्यक्तीचे ते प्रमाण वेगवेगळे असते. शरीरापेक्षा बाहेरी तापमान वाढल्यावर डी-हायड्रेशन होऊन (पाणी कमी होते) चक्कर येते, मळमळ होते. त्याचे प्रमाण जास्त झाले आणि संबंधितास वेळेत उपचार न मिळाल्यास त्याचा मृत्यू देखील होतो. त्यामुळे वाढत्या तापमानात घराबाहेर पडणे टाळावे.

Classified - छोटी जाहीरात

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरये
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे

उभे शब्द : १) वेलकम चित्रपटातील सहनायक अभिनेता २) नाकाने हुंगण्यासाठी केलेले तंबाखूचे चूर्ण ३) उशीर (हिंदीत) ४) महाराष्ट्राचे माजी वनमंत्री (फक्त आडनाव) ५) लहान खड्डा ६) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते ७) जोराने मारलेली आरोळी ११) फटाक्यांची माळ १६) मोजण्याचे प्रमाण १८) कर्नाटकातील एक जिल्हा २०) लग्नामध्ये नवऱ्या मुलाकडील मंडळींना उतरण्यासाठी दिलेली जागा २२) कामधंदा न करणारा २३) जोराचे रणकंदन २५) एकनाथ खडसेंचा जिल्हा ३१) बैलाच्या मानेमागील उंचवटा ३२) फॅक्टरी मराठीत ३३) टाकाऊ कागद ३४) व्याजाने पैसे देणारा ३६) केस कापणे ३९) विषमच्या विरूध्दार्थी ४०) एक शाकाहार - *** भात ४१) पं.नेहरूंनी दिलेली घोषणा - *** हराम है ४४) एक म्हण- ** करी काम ४६) दुनिया, विश्व ४७) अभिषेक

आडवे शब्द : १) लातूरचे युवा नेते ६) मोदी सरकारने खरेदी केलेले लढाऊ विमान ८) पंख (हिंदीत) ९) जलस्त्रोत, पाण्याचा कॉक १०) सल उलट लिहा १२) मुलगी (हिंदीत) १३) अजय देवगणचा एक चित्रपट १४) छोटी मोटारगाडी १५) विष्णूपत्नी, लक्ष्मी १७) महाभारतातील दुर्योधनाची आई १९) नायक चित्रपटातील टीव्ही रिपोर्टर अभिनेत्री - ** बात्रा २१) कुटुंब २४) आधार देणे २६) धावपटू (इंग्रजीत) २७) सबब, प्रयोजन २८) वाऱ्याचा झंजावात २९) नाव (हिंदीत) ३०) धुलीवंदन (ग्रामीण भाषेत) ३२) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा ३४) प्रामाणिक, खरा ३५) तोंडातील दातांची समूहरचना ३७) बेडकाचा आवाज ३८) स्पेशल, विशेष ४०) प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळ्या पिवळ्या गाड्या (ग्रामीण भाषेत) ४२) बदामाप्रमाणे एक सुका मेवा ४३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारा शब्द ४५) समोरासमोर झालेली नजरभेट ४८) पाठीचा कणा यापासून बनलेला आहे ४९) दु:ख (हिंदीत) ५०) पहिलवान शब्द थोडक्यात असा लिहितात- *

सुडोकु - 202

7	4			8			2	
6		2	4	3	7	5	8	9
3	5					7		
1	9		8	6		4	7	
	6				3	9		
		4			1			8
	3		6				1	
2		6				3		4
				7	4	2		5

सौर उर्जा प्रकल्पामुळे दुध उत्पादक सभासदांना होणार फायदा - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- देशातील सहकारी संस्थेचा पहिला सौर ऊर्जा प्रकल्प मौजे लिंबेवाडी ता. करमाळा येथे सुरू करण्यात आला आहे. गोकुळ दुध संघाचा वीजेवर होणारा खर्च कमी करण्यासाठी या सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी 33 कोटी रुपए खर्च करण्यात आला आहे. या प्रकल्पातून दैनंदिन साडेसहा मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. या वीज निर्मिती मधून गोकुळ दूध संघाची दर महिन्याकाठी सुमारे 50 लाख रुपयांच्या विजेची बचत होणार असून, याचा फायदा याचाही थेट फायदा भविष्यात गोकुळच्या सभासदांना होणार असल्याचे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या.कोल्हापूर (गोकुळ) यांचा ओपन ॲक्सेस स्कीम अंतर्गत 6.5 मे. वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प लिंबेवाडी ता. करमाळा येथे स्वमालकीच्या १८ एकर जागेवर कार्यान्वित करण्यात आला असून,दूध संघाच्या 62 व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून या प्रकल्पाचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार नारायण आबा पाटील, कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे चेअरमन अरुण डोंगळे, कार्यकारी संचालक डॉ.योगेश गोडबोले व गोकुळचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, यापूर्वी सूर्यापासून सौर प्रकल्प करण्याचा प्रयत्न केला होता परंतु आधुनिक तंत्रज्ञान वापरात नव्हते परंतु आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सौर ऊर्जाचे अत्याधुनिक पॅनल निघाले आहेत. त्यामुळे विविध क्षेत्राराठी लागणाऱ्या वीज निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जेचा वापर होत आहे. पंतप्रधान महोदयांनी सूर्यघर योजना जाहीर केली आहे. तसेच राज्य शासनानेही सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतला असून शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्प उभारून शेतकऱ्यांना शेत पंपासाठी दिवसा वीज पुरवठा देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे.

गोकुळ दूध संघाच्या माध्यमातून मौजे लिंबेवाडी ता. करमाळा येथे ॲक्सेस स्कीम अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प देशातील पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी 33 कोटींची गुंतवणूक केली असून वषार्ला सहा कोटी रुपये आर्थिक बचत होणार आहे. या प्रकल्पासाठी गोकुळ दूध संघाने मोठी गुंतवणूक केली असून तीन वर्षांनंतर हा प्रकल्प कर्जमुक्त होणार आहे. सूर्य हा भारत देशासाठी खजिना आहे. आगामी काळात सौरऊजेर्चा मोठ्या प्रमाणामध्ये वापर होणार आहे. अनेक वाहने सौरऊर्जेवर चालतील अशी नवीन टेक्नॉलॉजी येणार आहे. त्यामुळे भविष्यात पेट्रोल डिझेल इंधनावरील ताण कमी होईल असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार नारायण आबा पाटील म्हणाले, रिटेवाडी उपसासिंचन या भागात कार्यन्वित केल्यास या भागातील बराचसा भाग हा बागायत क्षेत्राखाली येणार आहे. तसेच हा भाग जर बागायती क्षेत्राखाली आला तर येथे होणारे स्थलांतर हे मोठ्या प्रमाणात रोखले जाणार असून रिटेवाडी उपसा सिंचन योजना कार्यन्वित करावी अशी त्यांनी यावेळी केली. तसेच याभागात गोकूळ सौरउर्जा प्रकल्प आणले बाबत कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे आभार मानले.

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे चेअरमन अरुण डोंगळे म्हणाले, हा सौर ऊजेर्चा प्रकल्प करमाळा तालुक्यातील लिंबेवाडी गावमध्ये 18 एकर माळरान जमिनीवर पुणे येथील एका खाजगी कंपनीच्या सहकायार्तून उभा केला आहे. येथे तयार झालेली वीज महावितरण कंपनीला देण्यात आली आहे. यासाठी सुमारे 18 किलोमीटर पर्यंतची वीज जोडणी स्वतः दूध संघाने केली आहे. आता पर्यंत दूध आणि त्या पासून बनणारे पदार्थ यांच्या विक्री आणि नफ्यातून गोकुळने प्रगती केली आहे. आता सौर ऊर्जा प्रकल्प करणारी गोकुळ ही देशातील पहिली सहकारी संस्था बनली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागरुक असावे : अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ग्राहकांना वस्तू निवडण्याचा, त्याचा दर्जा व प्रमाण जाणून घेण्याचा आणि खात्री करण्याचा अधिकारी ग्राहकांना असून, ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत नेहमी जागरुक असावे असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर व जिल्हा पुरवठा कार्यालय यांच्या वतीने जागतीक ग्राहक हक्कदिन आज जुने जिल्हाधिकारी कायार्लाय, बहुद्देशिय सभागृह येथे अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांच्या अध्यक्षतेत साजरा करण्यातआला. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पाडोळे, ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्य - श्रीमती श्रध्दा बहिरट, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य सोलापूर जिल्हा प्रमुख शोभना सागर, ग्राहक समिती जिल्हाअध्यक्ष संतोष कोल्हाळ, ग्राहक समिती सदस्य राजेंद्र घाडगे, शाहिर रमेश खाडे रेशन दुकानदार -महसूल कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर म्हणाल्या, ग्राहक हा राजा आहे. राजाला सन्मानाने जगायला पाहिजे. ग्राहकाचे अधिकार इतक्या प्रमाणात आहेत की त्याचा वापर करून ग्राहक राजासारखा जगू शकतो. ग्राहकाला कायद्याने सुरक्षितता, माहिती जाणण्याचा, निवडीचा, मत मांडण्याचा, उपाययोजना करण्याचा, शिक्षणाचा, मुलभूत गरजा, निरोगी वातावरणाचा अधिकार दिला आहे. फसवणूक होवू नये यासाठी या सर्व अधिकाराचा वापर ग्राहकाने करावा असे सांगून शासनाच्या शाश्वत जीवन शैली या ग्राहकांच्या खरेदी केलेली वस्तू व ती वस्तूचा टिकण्याचा कालावधी याबाबत माहिती दिली तसेच ग्राहकांनी चिकित्सक पणे प्रश्न विचारणे , व ग्रहकांची मोठयाप्रमाणात होणारी ऑनलाईन फसवणूक, वजन मापे याबाबत मार्गदर्शन केले.

ग्राहक हक्क दिना निमित्त सरडे यांनी प्रास्ताविकात केंद्र व राज्य सरकारच्या शाश्वत जीवन शैली या कायद्या विषयी व ग्राकांची फसवणुक कशी होते ग्राकांनी फसवणूकी पासुन सावसधानता बाळगली पाहिजे , ग्राकांचे हक्क काय आहेत, व फसवणूक झाल्यास त्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती कडे तक्रार करण्यात बाबत मार्गदर्शन केले.

तसेच श्रीमती श्रध्दा बहिरट, यांनी ग्राहकांनी आपली फसवणुक झाल्यास ग्राहकमंचा आधार घेण्याबाबत मार्गदर्शन केले तर शोभना सागर यांनी अन्याय झालेल्या ग्राहकांना न्याय देण्याबात ,खाद्यपदार्थांची भेसळ, तसेच ग्राहक संरक्षण समितीची बैठक नियमितपणे घेऊन ग्राकांचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत मार्गदर्शन करून ग्राहकांनी जागृत राहण्याबाबत मार्गदशने केले.

जागतिक ग्राहक दिना निमित्त सकाळी शंभर विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने सुरवात करण्यात आली, यामध्ये सिध्देश्वर प्रशाला व मुलींची सेवादन शाळा यांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवारात महाराष्ट्रशासनाच्या विविध विभागांचे स्टॉल (दालने) लावण्यात आले होते. यामध्ये जिल्हा पुरवठा विभाग, राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा शल्यचिकित्सक -आरोग्यविभाग, कृषी विभाग सोलापूर, प्रादेशिक परिवहन कायार्लाय सोलापूर, पोलीस आयुक्त- शहर वाहतुक विभाग, वैध मापन शास्त्र यंत्रणा, रसायण शास्त्र प्रयोगशाळा, अन्नऔषध प्रशासन सोलापूर, महा. राज्य विद्युतवितरण कंपनी, व भारत गॅस एजन्सी आदी स्टॉलला भेट देऊन श्रीमती ठाकूर यांनी पहाणी करून माहिती घेतली.

महात्मा गांधी विद्यालयात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

करमाळा (कटूसत्य वृत्त):- येथील महात्मा गांधी विद्यालयात मा. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. उपमुख्याध्यापक अनिस बागवान यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सहशिक्षक सचिन अब्दुले यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा आढावा घेतला. मा. आमदार स्वातंत्र्य सैनिक स्व. नामदेवराव जगताप यांचा आणि यशवंतराव चव्हाण यांचा स्वातंत्र्याच्या चळवळीत आलेला संपर्क, त्यानंतर महाराष्ट्रातील महत्त्वाच्या आलेल्या उजनी धरणाच्या निर्मितीचा इतिहास, नामदेवराव जगताप यांच्या सांगण्यावरून धरणाची बदललेली जागा, सोलापूर जिल्हा परिषदेची, जिल्हा बँकेची स्थापना, कुटीर

रुग्णालय, एस.टी.डेपो यासह महात्मा गांधी विद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय या शैक्षणिक संस्था उभारताना यशवंतराव चव्हाण यांचे झालेले सहकार्य या सर्व बाबींचा यावेळी उजाळा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद कोरडे यांनी केले.

इतिहासातील मढी उकरून नेमका कुणाचा फायदा ?

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गेल्या काही दिवसांपासून राज्यात औरंगजेबाच्या कबरीचे राजकारण चांगलेच तापले आहे.या विषयावर बोलताना त्या म्हणाल्या, इतिहासातली मढी उकरुन काढण्याची खोड वाईटच आहे. गेली ३५-४० वर्ष हिंदू-मुस्लीम धर्मांधता पेटती ठेवण्यासाठी जुनी पुराणी मढी उकरून त्याभोवती देशाचं राजकारण सत्तेसाठी पिंगा घालण्यात दंग आहे.त्यात आता औरंगजेबाच्या कबरीची भर पडलीय.

छत्रपती शिवाजी महाराज हयात असेपर्यंत औरंगजेबानं दख्खनमध्ये पाऊल ठेवण्याचं धाडस केलं नाही. कारण त्याला भीती होती की आपण माघारी जाऊ शकणार नाही.शिवरायांच्या निधनानंतर दोन वर्षांनी तो स्वतः पाच लाख सैन्यांसह दख्खनेत आला. पण त्याची गाठ छत्रपती संभाजी महाराज नावाच्या छाव्याशी पडली.संभाजीराजांनी न थकता सतत नऊ वर्षे मोगल, आदिलशहा, सिद्दी, पोतुर्गीज आणि अंतर्गत शत्रुविरुध्द निकराचा लढा दिला. मोघल फौजांना, साक्षात औरंगजेबाला सळो की पळो करून सोडले. मराठा साम्राज्य जिंकण्याचे त्याचे स्वप्न धुळीस मिळवलं. याच

द्वेषातून औरंगजेबानं संभाजीराजांना अतोनात हाल करून कपटानं मारलं. संभाजीराजांच्या मृत्यूनंतर ताराराणी आणि त्यांच्या मावळ्यांनी औरंगजेबला 'कबी'त घालण्याचं ऐतिहासिक कार्य केलं. पण त्यांनी त्याच्या इच्छेनुसार खुलताबादला त्याची 'कबर' होऊ दिली. यातून त्यांनी शिवाजीराजांचा स्वराज्यधर्म जागवला.मंदिर- मशिदीच्या जागांवरून,

कबरीवरुन वाद होणं चांगलं नाही. शांतता आणि सुव्यवस्थेच्या काळात देशाची प्रगती चांगली होते.

भावनिक मुद्दयांना जेव्हा महत्व येतं,तेव्हा लोकांचे मूलभूत प्रश्न मार्ग पडतात. इतिहासाचा सार्थ अभिमान बाळगताना ते प्रगतीच्या गळ्यातील लोढणं होणार नाही; याची दक्षता घेतली पाहिजे. सामोपचार आणि सामंजस्यानं ऐतिहासिक वादावर तोडगा काढला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

वैभवशाली इतिहासाचा अभिमान असायला हवा; परंतु इतिहासातील मढी उकरून काढून त्यातून हाती काय लागणार ? हे तपासलं पाहिजे. एकीकडं देश भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, महिला अत्याचार,गुन्हेगारी, जातीयवाद अशा प्रश्नांनी जळत असताना दुसरीकडे माथी भडकविणारे विषय उकरुन हेतुपुरस्सर जनतेचे लक्ष भटकविण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे परखड मत बहुजन रयत परिषदेच्या प्रदेशाध्यक्ष कोमल साळुंखे-ढोबळे यांनी मांडले.

गणपती फार्मसीचा थ्रो बॉल स्पर्धेमध्ये कृष्णा फार्मसी कराडवरती दणदणीत विजय

टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):- धनलक्ष्मी फाउंडेशन कराड लेट ॲड. दादासाहेब चव्हाण मेमोरियल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माळवाडी मसूर, डिप्लोमा इन फार्मसी स्पोर्ट्स असोसिएशन (एसकेएस फार्मा स्पोर्ट्स-२के२५), इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (आयपीए), असोसिएशन ऑफ फार्मसी टीचर्स (एपीटीआय) यांच्या सहकायार्ने आयोजित राज्यस्तरीय थ्रो बॉल स्पर्धेत कराडच्या कृष्णा फार्मसी कॉलेजचा पराभव करत गणपती फार्मसीने विजय मिळवला. राज्यातील ३६ फार्मसी महाविद्यालयाचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत तीव्र स्पर्धा आणि खिलाडूवृत्ती दिसून आली. गणपती फार्मसी च्या संघाने संपूर्ण सामन्यात उल्लेखनीय कौशल्य आणि सांघिक कामगिरीचे प्रदर्शन केले. शेवटी

त्यांच्या जबरदस्त प्रतिस्पर्धांविरुद्ध योग्य विजय मिळवला. गणपती फार्मसीच्या प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. त्यांच्या समर्पण आणि कठोर परिश्रमाचे कौतुक केले. या स्पर्धेमध्ये संजीवनी मासाळ, प्राजक्ता शिंदे, काजल रजपूत, वैष्णवी सलगर, कृतिका वैद्य, राजलक्ष्मी दुपडे आणि सोनाली तळेकर यांनी सहभाग घेतला होता. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेचे सचिव डॉ. आर.डी. बेंदगुडे, अध्यक्ष ॲड, विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयातील या संघास धनश्री कारंडे, रूपाली राऊत, पूजा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

वैराग नगरपंचायतीकडून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

वैराग (कटूसत्य वृत्त):- समाजातील प्रत्येक घटकाला ज्या त्या परीने वेळोवेळी घडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि आपल्या उल्लेखनीय कायार्चा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा सन्मान वैराग नगरपंचायतीच्या वतीने रविवारी (दि. १६) करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरच्या उपजिल्हाधिकारी अंजली मरोड ह्या उपस्थित होत्या. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वैराग नगरपंचायतीने रविवारी शहाजीराव पाटील सांस्कृतिक भवनमध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजातील उल्लेखनिय काम करणाऱ्या रंगिणीना पुरस्कार देवून सन्मानात येत आहे. माजी जि. प. सदस्या रेखा भूमकर ह्या होत्या. सन्मानित करण्यात आलेल्या महिलांमध्ये सफाई कर्मचारी तारामती लोंढे, उत्कृष्ट माता कमल घोटकर, संयुक्त कुटुंब आणि उत्तम धार्मिक कार्य कुसूम कासार, उद्योजिका लीना भूमकर, सुसंस्कृत माता भगीरथी ऐनापुरे, उत्कृष्ट आरोग्य सेवा कुसूम दळवी यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका, सुपरवायझर, आशा वर्कर आणि विद्यार्थिनींना सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमासाठी महिला आणि बालकल्याण सभापती जैतूनबी बागवान, डॉ. मधुरा बाजारे, प्रा.अनिता मोहिते, डॉ. संगीता देशमुख, नगरसेविका तृप्ती भूमकर, आस्मा मिर्झा, पद्मिनी सुरवसे, गुरुबाई झाडमुखे, जयश्री घोडके, राणी आदमाने, अर्चना माने, आशादेवी वाघ यांच्यासह अनेक महिला वर्ग उपस्थित होत्या. या कार्यक्रमास नगरपंचायतीचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन रेड्डी यांनी केले तर आभार नगरसेविका तृप्ती भूमकर यांनी मानले.

कुर्डूवाडीत काँग्रेसच्या वतीने इफ्तारपार्टी उत्साहात

कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त):- येथील शहर काँग्रेसच्या वतीने रमजाननिमित्त शहराध्यक्ष फिरोज खान यांच्या नेतृत्वाखाली रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते सर्वप्रथम हाफिज फजले रजा यांच्या नियत पठणानंतर रोजा सोडण्यात आला याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह समाजबांधवांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात दिसून आली.या इफ्तारमध्ये सामील झालेल्या मान्यवरांचे काँग्रेस अल्पसंख्याक शहराध्यक्ष हमीद शिकलकर यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

यावेळी करमाळ्याचे आ.नारायण पाटील, पो.नि. सुरेश चिल्लावर नासिर दाळवाले किफायत शेख वलीमोहम्मद मुलाणी रवी आठवले दत्ताजी गवळी विलास उबाळे गणेश त्रिंबके प्रद्युमन सातव बालाजी साबळे वाहेद शेख शंकर बागल माणिक श्रीरामे छगन निचळ सतीश शिंदे वसीम मुलाणी अमीर मुलाणी शहनवाज शेख अजीम तांबोळी संजय अस्वरे अनिल सोनवर राहुल मिठारी सिद्धार्थ झिंगळे अमर जगताप जय काळे संदीप भराटे आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुधीर क्षीरसागर तर आभार सचिव निलेश गवळी यांनी मानले.

वेरुळ येथून निघालेली जिजाऊ रथयात्रा २५ मार्चला सोलापुरात दोन दिवस मुक्काम असेल

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मराठा सेवा संघ आयोजित मराठा जोडो अभियान जिजाऊ रथयात्रा सोलापूर जिल्ह्यात येत आहे. या यात्रेचा सोलापुरात दोन दिवस मुक्काम असेल. मंगळवारी (दि. २५) सायंकाळी साडेपाच वाजता छत्रपती संभाजी महाराज चौकात यात्रेचे आगमन होईल. जिजाऊ रथ यात्रेच्या स्वागताची तयारी मराठा सेवा संघाच्या सोलापूर शाखेच्या वतीने केली जात आहे.शहरात ठिकठिकाणी समाज बांधवांच्या बैठका घेऊन जिजाऊ रथयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. १८ मार्चला छत्रपती शहाजी महाराज यांच्या जन्मदिनी भोसले गढी वेरूळ येथून या जिजाऊ रथयात्रेची सुरुवात होणार आहे. तर एक मे महाराष्ट्र दिनी पुण्यातील लालमहालात तिची सांगता होईल. २५ मार्चला छत्रपती संभाजी महाराज चौक, जुना पूना नाका येथे जिजाऊ रथाचे आगमन झाल्यानंतर जंगी स्वागत होईल.त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून चार हुतात्मा चौकात

जाहीर सभा होणार आहे.

पुरुषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पनेतून यापूर्वी मराठा सेवा संघाने जिजाऊ रथयात्रेचे यशस्वी आयोजन केले आहे. मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, सेवा संघाच्या सर्व कक्षाच्या वतीने स्वागताची तयारी केली जात आहे. मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील,जिल्हाध्यक्ष डॉ. जे. के. देशमुख,शहराध्यक्ष सूर्यकांत पवार, सदाशिव पवार, दत्ता मुळे, उज्ज्वला साळुंखे,लक्ष्मण महाडिक, प्रकाश ननवरे, आर.पी. पाटील, दीपक शेळके, अविनाश गोडसे हे पदाधिकारी शहरात विविध भागांत बैठका घेऊन समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन करत आहेत. जळे सोलापूर, दमाणी नगर, गवळी वस्ती, निराळे वस्ती, यश नगर,मोदी, संतोष नगर, बैठका झाल्या आहेत. या बैठकांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

अशी असेल जिजाऊ रथ यात्रा

- १८ मार्च : वेरूळ, गंगापूर, नेवासा अहिल्यानगर
- १९ मार्चः अहिल्यानगर, श्रीगोंदा, दौंड, बारामती
- २० मार्चः बारामती, फलटण, वाठार, सातारा
- २१ मार्चः सातारा, कोरेगाव, रहिमतपूर, कराड, इस्लामपूर, कोल्हापूर
- २२ मार्च : कोल्हापूर, हातकणंगले, शिरोळ, जयसिंगपूर, सांगली
- २३ मार्चः सांगली, तासगाव, कवठे महांकाळ, सांगोला, पंढरपूर
- २४ मार्चः पंढरपूर, अकलूज, टेंभुर्णी, कुडुर्वाडी
- २५ मार्चः कुडुर्वाडी, माढा, मोहोळ, सोलापूर
- २६ मार्चः सोलापुरातून तुळजापुरमार्गे पुढील प्रवासासाठी रवाना होईल.

शहरातील चौकाचौकांत मटका अड्डे जोरात, पोलिसांचे याकडे दुर्लक्ष

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गेल्या काही महिन्यापासून शहरातील चौका-चौकांत मटका अड्डे खुलेआम सुरू आहेत.नागरिकांनी तक्रारी करूनही पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने मटका अड्डे कुणाच्या आश्रयाने सुरू आहेत याबाबत शंका उपस्थित होत आहे. त्यामुळे मटका अड्डयांविरोधात पोलिसांच्या कारवाईचे केवळ फार्सच ठरणार का? अशी शंका उपस्थित होत आहे.शहरातील अवैध व्यवसायाने पुन्हा जोर धरला असल्याचे चित्र दिसत आहे. बंद असलेल्या टपऱ्या पुन्हा सुरू होत असून,आकडेमोड करणाऱ्या पाट्या खुलेआम झळकू लागल्या आहेत. काहींनी विद्या देवता गणरायाच्या मूर्तीसमोरच टक्याच्या पाट्या लावून अवैध व्यवसाय केले जात आहेत.तर येथे चालतो मटका जोरात कन्ना काही पोलिस ठाणे हद्दीत किरकोळ तर काही पोलिस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणात मटका सुरू आहे. रेल्वे स्टेशन, फॉरेस्ट, शास्त्रीनगर,भैया चौक, नवी पेठ, पांजरापोळ चौक, चौक, पाथरुट चौक, अशोक चौक, नीलमनगर,अक्कलकोट रोड एमआयडीसी, विडी घरकुल,बाळीवेस, बाळे आदी ठिकाणी मटका जोरात सुरू आहे. दुसरीकडे शहरातील मटका तसेच सर्वच प्रकारचे अवैध व्यवसाय बंद असल्याचा दावा पोलिस विभागाकडून केला जात आहे. पण, तसे कोठेही दिसून येत नाही. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी पदभार घेतले. तेव्हा शहरात अवैध धंदे बंद होतील अशी अपेक्षा होती. मात्र तसेच होताना दिसून येत नाही. शहरात खुलेआम मटका व्यवसाय सुरु आहे.यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होत आहे. याकडे पोलिसांनी त्वरित लक्ष देऊन असे व्यवसाय बंद करावे अशी मागणी आता सोलापूरकरांमधून होऊ लागली आहे.अवैध व्यवसाय जोरात सध्या सर्व अवैध व्यवसाय सुरू असल्याचे दिसून येत आहे. लिसांकडून कारवाई केली जात आहे. मात्र अवैध व्यवसाय करणाऱ्यावर धाक बसेना. सध्या तर बंद लेल्या मटका टपऱ्या पुन्हा सुरू झाल्या असून, प्रत्येक ठिकाणी मटक्याच्या आकड्यांच्या पाट्या लावल्या जात आहेत.